श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मार्च २०२५ | वर्ष–१३ अंक–३ | मासिक, पाने ०८ | Regn. no. - MAHMAR/2022/86035

# वालावलकर रुग्णालयात अद्ययावत नेक्स्ट जनरेशन डीएनए सिक्वेन्स सिस्टिमद्वारे जेनेटिक बदल निदान सुविधा उपलब्ध



*डावीकडून डॉ. योगेंद्र शेळके, डॉ. अनुप नीलावर, डॉ. आनंद जोशी, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. श्रीपाद बाणावली, डॉ. अभय देसाई, डॉ. सुधीर जोशी, श्री. अशोकराव जोशी, डॉ. नीलम शिरसाट, पाठीमागे श्री.पार्थ प्रभुदेसाई (लॅब टेक्निशियन), डॉ. सुनील नाडकर्णी, डॉ. नेताजी पाटील (रेडिओलॉजिस्ट ), सुचिता देवरुखकर, दीक्षिता लाड (लॅब टेक्निशियन)*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज संचालित भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर रुग्णालय सावर्डे ता. चिपळूण येथे दि. १४ मार्च २०२५ रोजी 'नेक्स्ट जनरेशन डीएनए सिक्वेन्स सिस्टम' वापरून गुणसूत्रातील दोष निदान करण्यासाठी अद्ययावत यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. या अत्यंत उच्च दर्जाच्या अद्ययावत सुविधेचे उद्घाटन श्री सहजानंद सरस्वतीमहाराज यांच्या प्रतिमला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने मुंबईतील प्रसिद्ध रोबोटिक जॉईंट रिप्लेसमेन्ट ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. सुधीर जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. सुधीर जोशी हे श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे ट्रस्टीदेखील आहेत. श्री. अशोक रघुनाथ जोशी (प्रमुख ट्रस्टी), श्री. विकास वालावलकर (मॅनेजिंग ट्रस्टी), डॉ. श्रीपाद बाणवली(डायरेक्टर–ॲकॅडेमिक्स, टाटा मेमोरिअल सेंटर,मुंबई), डॉ. सुनील नाडकर्णी (स्पाईन सर्जन), डॉ आनंद जोशी (गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजिस्ट), डॉ. ऋता मुल्हेरकर (शास्त्रज्ञ), डॉ. सुवर्णा आणि डॉ. नेताजी पाटील आदी मान्यवर ह्या कार्यक्रमास उपस्थित होते. ज्यांनी ह्या नवीन प्रणालीचा फायदा कोकणातील जनतेला व्हावा याकरता कष्ट घेतले आहेत त्या जिनोमिक तज्ज्ञ शास्त्रज्ञ डॉ. नीलम शिरसाट याही उपस्थितीत होत्या.

शास्त्र अतिशय वेगाने प्रगती करीत आहे आणि त्या वेगाशी आपण सतत बरोबरी करत राहणे हेच आता गरजेचे आहे. तरच आपण जागतिक पटावर आरोग्याच्या बाबतीत प्रगती करू शकू. येत्या दशकामध्ये वैद्यकीय उपचारांची दिशा ही पूर्णतः शरीरातील जनुकीय माहिती आणि त्यातील महत्त्वाचे बदल जे ठराविक आजाराला कारणीभूत आहेत त्यावर ठरणार

आहे. प्रत्येक जीवमात्रात A,T,C,D ही चार न्युक्लिओटाइड एका 'डी.एन.ए.'च्या साखळीत गुंफली आहेत आणि अशा दोन परस्परातील साखळ्या एकमेकांशी जुळल्या की एक परिपूर्ण 'डी.एन.ए.' तयार होतो. याची 'लडी' ही प्रत्येक पेशीच्या गर्भात स्थित आहे. साधारणपणे मनुष्यामध्ये मात्र आपण ९९ प्रतिशत सारखेच आहोत. पण उरलेला एक टक्का आपल्याला इतर व्यक्तींपासून वेगळं बनवतो. पण जर काही कारणाने हा क्रम बदलला तर कर्करोगासारखे आजार निर्माण होतात. अगदी याचेच निदान करण्यासाठी ही सुविधा वालावलकर रुग्णालयात स्थापित केली आहे. त्यामुळे कर्करोगासाठी कोणत्या विशिष्ट पेशीतील 'डी.एन.ए.' बदल कारणीभूत आहे आणि कोणते औषध लागू पडेल हे आता अचूक समजणार आहे. त्यामुळे कॅन्सरग्रस्त रुग्णाचे आयुष्य वाढण्यास मदत होणार आहे. तसेच जंतुसंसर्ग किंवा क्षयरोगाचे जंतू आणि त्याला मात देणारी योग्य औषधे ही देखील त्वरित समजल्याने गंभीर आजाराचे उपचार करण्यासाठी मदत होणार आहे. नवजात बालकातील जन्मजात दोष हे मातेच्या गर्भात बाळ असताना मातेच्या रक्तातून पहिल्या काही दिवसातच कळू शकणार आहेत. इतकेच नाही तर आता मधुमेहाला कारणीभूत 'डी.एन.ए.'मध्ये बदल आणि त्यानुसार त्यावर योग्य उपचार शक्य होणार आहेत. ह्या नवीन पद्धतीवर प्रकाश टाकण्यासाठी रुग्णालयाने मधुमेही रुग्णांचे सर्वेक्षण सुरू केले आहे. या सुविधेचा लाभ जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत पोचावा याकरिता डॉक्टरांसाठी मार्गदर्शनपर व्याखाने देऊन जागृती सुरू आहे. प्रत्येक चाचणीसाठी खर्च कमी व्हावा याकरिता प्रयत्न सुरू आहेत. 'नेक सॅक १०००' हे 'इलूमिना' या अमेरिकन कंपनीचे उत्पादन असून ही उच्च दर्जाची सुविधा वापरायला सोपी, जलद, उच्च दर्जाचे सिक्वेन्सिंग करणारी आहे आणि त्यात एन.आय. पी.टी., ट्रान्सक्रिप्टोम, एक्झोम सिक्वेन्स आणि संगणकाद्वारे सेकंडरी ॲनालिसिसची सोय आहे. 'रमा पुरुषोत्तम फौंडेशन' ह्या सेवाभावी संस्थेने ह्या यंत्रणेचा आर्थिक भार उचलला आहे. याकरिता एक स्वतंत्र वातानुकूलित कक्ष उभारण्यात आला आहे आणि त्यांची तांत्रिक जबाबदारी आणि संशोधन हे जिनोमिक शास्त्रज्ञ डॉ. नीलम शिरसाट करणार आहेत. कोकणातील ही अद्ययावत जनुकीय प्रणाली आरोग्य उपचारातील एका नवीनच दालनाचे दार उघडणार आहे हे निश्चित.

## 'बौद्धिक संपदा अधिकार आणि कॉपी राइट्स' या विषयावर डॉ. यामिनी कुलकर्णी यांचे व्याख्यान



*आयपीआर आणि कॉपी राइट्स या विषयांवर व्याख्यान देताना डॉ. यामिनी कुलकर्णी*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय हे नेहमीच संशोधनाच्या बाबतीत सजग असते. आपल्या समस्यांचे आपणच निवारण करायचे असते आणि त्याकरिता सतत जागरूक असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने आपली बौद्धिक संपदा आणि त्या विषयीचे अधिकार आपण कसे जतन करू शकतो हा विषय महत्त्वाचा ठरतो. 'बौद्धिक संपदा अधिकार आणि जतन' या विषयावर डॉ. यामिनी कुलकर्णी यांनी दि. १ मार्च २०२५ रोजी व्याख्यान देऊन वैद्यकीय प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. व्याख्यानाला वैद्यकीय महाविद्यालयाचे चाळीस प्राध्यापक हजर होते. एखादा शोध असेल किंवा एखादी कल्पना असेल तर त्यांची मालकी कशी सिद्ध करणार? याच प्रश्नातून बौद्धिक संपदा अधिकाराचा उगम होतो आणि यालाच Intellectual Property Rights (I.P.R) असे म्हणतात. यामध्ये आपण लावलेला एखादा शोध, एखादे चिन्ह, जगासमोर आणलेली एखादी कल्पना ही आपलीच आहे यासाठी आपल्याला कायद्याने हक्क मिळावा म्हणून बौद्धिक संपदा अधिकार म्हणजेच I. P. R निर्माण झाला आहे. कार्यशाळेत मिळालेल्या माहितीमुळे पेटंट घेणे ह्या विषयात नक्कीच गती प्राप्त होणार आहे.

**डॉ. भूषण पटवर्धन (यू.जी.सी.चे माजी उपाध्यक्ष) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दि. २७ जानेवारी २०२५ रोजी वालावलकर रुग्णालय आणि मेडिकल कॉलेजला सदिच्छा भेट दिली. त्याविषयी त्यांच्याच शब्दात –**



डावीकडून – डॉ. नेताजी पाटील, डॉ. श्रीहरी हसबनीस, श्री. बाळासाहेब काजरेकर, डॉ. श्रीपाद बाणावली, वैद्य प्रशान्त सुरू, डॉ. सुनील नाडकर्णी, श्री. अशोकराव जोशी, डॉ. भूषण पटवर्धन, डॉ. नितीन करमळकर, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. नंदन कानविंदे, डॉ. सुवर्णा पाटील, वैद्य गिरीश टिल्लू आणि अन्य

''डेरवणला भेट देणे हा एक डोळे उघडणारा आणि प्रेरणादायी अनुभव होता, ज्यामध्ये ग्रामीण समाजाच्या उन्नतीसाठी समर्पित अध्यात्म, आरोग्यसेवा, शिक्षण आणि समग्र विकासाचा उत्तम समन्वय दिसून आला. डेरवणच्या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी बी.के.एल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि ८१० बेड्सचे अद्ययावत सुविधांनी सुसज्ज रुग्णालय, नर्सिंग आणि फिजिओथेरपी महाविद्यालये आहेत जी कोकण प्रदेशातील वंचित लोकसंख्येला सेवा देत आहेत. अत्यंत दुर्गम भागातदेखील दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून आणि त्याचबरोबर जागतिक दर्जाचे शिक्षण देऊन ग्रामीण समाजाच्या सेवेचे महत्त्व यामुळे अधोरेखित होत आहे. आधुनिक आणि पारंपरिक खेळांसाठी सुविधा देणारे ऑलिंपिक दर्जाचे क्रीडासंकुल आणि एक नावीन्यपूर्ण शाळा ही या चैतन्यशील कॅम्पसची इतर अद्वितीय वैशिष्ट्ये आहेत.

कोकणातील लहान गावांमधील तरुणींच्या डोळ्यांतील आत्मविश्वास आणि देहबोली मनाला भावून गेली. या मुली, अन्यथा दर्जेदार शिक्षणाची संधी न मिळाल्याने कोमेजून जाणार होत्या त्यांना पुन्हा उमलताना पाहता आले. त्यांना रोबोटिक्स आणि अवकाश विज्ञान, जैवतंत्रज्ञान, पोषण आणि आहारशास्त्र यासारख्या भविष्यकालीन विषयांची माहिती मिळते, त्याचबरोबर पारंपरिक कला, डिझाइन आणि कुटीर उद्योग उत्पादनांमध्ये पारंपरिक कौशल्ये शिकता येत आहेत. हे अद्वितीय शैक्षणिक संकुल त्यांना मोठे स्वप्न पाहण्यास आणि त्याचबरोबर त्यांची मुळे भक्कम करण्यास मदत करत आहे.

आणखी एक आकर्षण म्हणजे शिव-समर्थ सृष्टी, जी छत्रपती शिवाजीमहाराजांच्या जीवनाचे आणि वारशाचे प्रेरणादायी चित्रण करते. हे प्रदर्शन, नक्षीदार शिल्पे आणि तपशीलवार कथांद्वारे, इतिहास जिवंत करते, पर्यटकांना धैर्य, दूरदृष्टी आणि नेतृत्वाच्या कथांनी प्रेरित करते.

हे उल्लेखनीय उपक्रम श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आणि श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या समर्पणाने, श्री अशोकराव जोशी यांच्या दूरदर्शी आध्यात्मिक मार्गदर्शनाखाली आणि मुंबईतील प्रख्यात दानशूर श्री. विकास वालावलकर यांच्या उदार पाठिंब्याने चालवले जातात. हे ट्रस्ट आरोग्यसेवा, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि अध्यात्म आणि ऐतिहासिक वारसा जपत समाज्याच्या समग्र विकासाचे कार्य करण्यासाठी वचनबद्ध आहेत. या प्रेरणादायी उपक्रमाची ओळख करून दिल्याबद्दल मी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचे आभार मानतो. डेरवणचा प्रवास लांबलचक होता पण तितकाच समृद्ध करणारा होता. शिवाय वैद्य प्रशांत सुरू आणि वैद्य गिरीश टिल्लू यांच्या जाणकार सहवासामुळे, त्यांनी वाटेत शेअर केलेल्या मनोरंजक अनुभवांमुळे तो अधिकच समृद्ध करणारा ठरला.

डेरवणमधील नावीन्यपूर्ण संशोधन आणि सामाजिक उपक्रम पाहणे प्रेरणादायी आहे. दूरदर्शी आणि बुद्धिमान लोक एकत्र येऊन त्यांनी समाज्याच्या उत्थानासाठी काम केल्याने निश्चितच समाजात एक वेगळा ठसा उमटवला आहे. हे असे ठिकाण आहे जिथे अध्यात्माला आधुनिकतेची जोड मिळाल्यामुळे ग्रामीण भारताचे भविष्य निश्चितच उज्ज्वल होणार आहे. खरोखर, प्रवर्तक, भक्त आणि कर्मचारी यांच्या निःस्वार्थीपणामुळे इथे हे देवाचे कार्य घडत आहे. आपल्या सर्वांना आपल्या सभोवतालच्या जगात अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी डेरवण हे प्रेरणा देत राहो.

– भूषण पटवर्धन

# प्रा. शेखर मांडे व प्रा. शर्मिला मांडे यांची रुग्णालयाला सदिच्छा भेट





*डावीकडून : डॉ. नेताजी पाटील, डॉ. योगेंद्र शेळके, डॉ. सुनील नाडकर्णी (स्पाईन सर्जन),श्री. अमीत साळवी, डॉ. श्रीपाद बाणवली (डायरेक्टर-ॲकॅडेमिक्स, टाटा हॉस्पिटल, मुंबई) श्री. विकास वालावलकर (ट्रस्टी), श्री. अशोकराव जोशी, प्रा. शेखर मांडे व प्रा. शर्मिला मांडे, डॉ. सुवर्णा पाटील (मेडिकल डायरेक्टर), डॉ. शर्मिला कानविंदे, डॉ. ऋता मुल्हेरकर*

प्रा. शेखर मांडे व प्रा. शर्मिला मांडे यांनी १३ व १४ एप्रिल २०२५ रोजी भ.क. ल. वालावलकर रुग्णालयाला व हॉस्पिटलला भेट दिली. शेखर सी. मांडे हे बायॉलॉजिस्ट असून भारताच्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (CSIR) माजी महासंचालक आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन विभागाचे (DSIR) माजी सचिव आणि पुण्यातील राष्ट्रीय पेशी विज्ञान केंद्राचे संचालक होते.

२००५मध्ये त्यांना जैविक विज्ञान श्रेणीतील भारतातील सर्वोच्च विज्ञान पुरस्कार 'डॉ. शांती स्वरूप भटनागर पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले होते. त्यांनी संस्थेला भेट देऊन रुग्णालयासह सर्व उपक्रमांची माहिती घेतली आणि संस्थेच्या कार्याबद्दल संतोष व्यक्त करून, अशा संस्था निर्माण करताना ग्रामीण भागातील अडचणी आणि त्यावर केलेली मात याचे ही संस्था म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे असे नमूद केले आणि भविष्यात सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही दिले.

शर्मिला मांडे यांनी फिजिक्स विषयात 'पीएच.डी.' पदवी 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ सायन्स' ह्या प्रतिष्ठित संस्थेतून संपादन केली आहे. त्यांचे शरीरातील जीवाणू 'मायक्रो बायोम' ह्या विषयावर मोलाचे संशोधन सुरू आहे. त्यांनी वालावलकर महाविद्यालयात सुरू असलेल्याला संशोधनात सहभागी होण्याचा मानसदेखील व्यक्त केला.

## प्रा. शेखर मांडे यांचा अभिप्राय –



I had the privilege to visit this place on 13/03 & 14/03/2025, this visit has been long overdue. It is needless to mention that every good thing that I had heard about this place, not only met my expectations, but exceeded it. The whole institution has been outstandingly managed. The enormous challenges in setting up rural medical school and hospital have been overcome with amazing dignity. I look forward to visiting the place again in future.

All the very best!

# श्री शिव-समर्थ गड, श्रीक्षेत्र डेरवण येथे दासनवमी उत्सव साजरा !



मा. श्री. ओंकार जोशी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन




मा. श्री. ओंकार जोशी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण
सोबत श्री. विकासराव वालावलकर

श्रीक्षेत्र डेरवण येथील ब्रह्मवृंदाने सामूहिक शान्तिसूक्त पठणाने दासनवमी कार्यक्रमाची सुरुवात केली. मा. श्री. ओंकार जोशी, प्रबंधक, लाईफ इन्शुरन्स कंपनी, तसेच इंडॉलॉजिस्ट व भारतीय चित्रकलांचे अभ्यासक - शिक्षक हे प्रमुख पाहुणे लाभले. मान्यवरांच्या हस्ते समर्थांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीपप्रज्वलन करण्यात आले. श्री. यश कापडी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. संस्थेचे विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला तसेच प्रशालेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी डेरवण केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. शेंबेकरगुरुजी व समन्वयक श्री. कोलतेगुरुजी यांचे पुष्प देऊन स्वागत केले.

प्रास्ताविकादरम्यान बोलत असताना शाळा संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी श्रीसद्गुरू दिगंबरदासमहाराजांनी सुरू केलेल्या दासनवमी उत्सवामागची भूमिका व स्वरूप सांगत श्री अशोकराव जोशी यांनी या उत्सवाला दिलेल्या नव्या स्वरूपाविषयीचीही माहिती दिली. समर्थांच्या कार्याविषयी बोलत असताना त्यांच्या साहित्यसंपदेतील आरत्या, स्तोत्रे, मनाचे श्लोक या सगळ्या बालवयात केलेल्या पाठांतराचा उपयोग विद्यार्थ्यांना मोठेपणी समजेल तसेच भारतीय संस्कृती जतन करणे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी विशद केले. बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे कौतुक करत दरवर्षी यशस्वी होण्यास प्रेरित केले.

यानंतर विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या निमित्ताने पाठ केलेली समर्थ रचित स्तोत्रे व आरत्या म्हटल्या. यामध्ये डेरवण नं. १ शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी सद्गुरू वंदनाष्टक, डेरवण सुतारवाडी शाळेतील इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी मनोबोध तसेच डेरवण इंग्लिश मीडियम स्कूलच्या इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी बाबामहाराजांची आरती व इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी रामचंद्रवंदनाष्टक पठण केले. यानंतर दासनवमी उत्सवाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या पाठांतर स्पर्धेचा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख पाहुणे श्री. ओंकार जोशी यांच्या हस्ते १७३ विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. यानंतर प्रमुख पाहुणे श्री. ओंकार जोशी यांनी विद्यार्थ्यांशी गोष्टीरूप संवाद साधला. राष्ट्र उभारणीत समर्थांनी दिलेले अनमोल योगदान याविषयी सांगत असताना शिवाजीमहाराज आग्र्याहून निसटल्यानंतर सुखरूप स्वराज्यात पोहोचण्यामागे समर्थांचे गुप्त पाठबळ असल्याचे त्यांनी नमूद केले. समर्थ शिवरायांना पत्रे लिहित असताना वापरत असलेल्या विविध क्लृप्त्या व त्यातून शत्रू पक्षातील अचूक हालचालींचा संदेश समर्थ शिवरायांना देत असल्याचे त्यांनी सांगितले. यम नचिकेत याची कथा सांगताना प्रेयसाकडून श्रेयसाकडे जायचे असेल तर विवेक आवश्यक असल्याचे त्यांनी प्रकर्षाने नमूद केले. नामस्मरणाचे महत्त्व सांगत असताना वाल्याचा वाल्मिकी कसा झाला हे कथन केले. समर्थांच्या दासबोधातील मूर्ख लक्षणे तर विचार करायला भाग पाडतात व नकळत आपण आपल्याच अंतरंगात डोकावून पाहू लागतो व तेव्हा समर्थांची समर्थता कळल्याशिवाय राहत नाही असे ते म्हणाले. प्रभुरामचंद्र व श्रीहनुमंत ही दोनच समर्थाची उपास्य दैवतं होती; यांविषयीची कारणमीमांसा करत असताना जीवनादर्श असलेल्या रामरायांच्या राज्यासारखं राष्ट्र घडवण्याचे स्वप्न समर्थांनी शिरोधार्य मानले असल्याचे ते म्हणाले व यासाठी हनुमंतांसारखी विवेकसंपन्न व बलसंपन्न तरुण पिढी समर्थांना घडवायची होती. असे विचार त्यांनी सोप्या शब्दांत व ओघवत्या शैलीत माडले. भाषणाच्या शेवटाकडे येत असताना जंकफूड खाऊ नका, मोबाईलचा वापर टाळा, अभ्यास - अध्ययन व पाठांतर याबरोबरच निरीक्षणशक्ती वाढवा ज्यातून योग्य व अयोग्य कळायला मदत होईल. त्याचबरोबर शरीर व मन सुदृढ ठेऊन मन बळकट करण्याचा सल्ला ओंकारजींनी विद्यार्थ्यांना दिला.




*मा. श्री. ओंकार जोशी यांचा श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते सत्कार; सोबत श्री. अशोकराव जोशी आणि सौ. शरयू यशवंतराव*

यानंतर श्री. ओंकार तांबे यांनी प्रमुख पाहुणे श्री. ओंकार जोशी व उपस्थित सर्व श्रोत्यांचे आभार मानले. सामूहिक वरयाचना पठणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली व प्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी, संस्थेचे विश्वस्त *श्री. अशोकराव जोशी आणि* श्री. विकासराव वालावलकर, शाळा संचालिका सौ. शरयू यशवंतराव, केंद्र प्रमुख श्री. शेंबेकर, पाठांतर स्पर्धेचे समन्वयक श्री. कोलते, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.




*स्तोत्रपठण*




*मा. श्री. ओंकार जोशी आपले विचार व्यक्त करताना*

## वैद्यकशास्त्रातील 'ए.आय.' (कृत्रिम बुद्धिमत्ता) या विषयावर श्री. अधीश थिटे यांचे वैद्यकीय विद्यार्थ्यांना व्याख्यान



*श्री. अधीश थिटे आपले विचार व्यक्त करताना*

सध्या, वैद्यकीय क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाला आहे आणि येत्या काही वर्षांत ए.आय. ह्या क्षेत्रातील संशोधन प्रचंड गतिमान होऊन बहुतांशी वैद्यकीय उपचार हे ए.आय. प्रणालीचा वापर करून त्वरित उपलब्ध होतील हे कोणीही नाकारू शकत नाही. आणि म्हणूनच भावी वैद्यकीय विद्यार्थ्यांना वैद्यकीय चिकित्सेचे आणि वैद्यकीय प्रतिमांचे विश्लेषण करण्यासाठी ए.आय. उपयुक्त ठरेल. वैद्यकीय चिकित्सेची साधने डॉक्टरांना त्यांच्या रुग्णाशी संबंधित माहिती किंवा संशोधनाची जलद उपलब्धता प्रदान करून उपचार, औषधे, मानसिक आरोग्य आणि रुग्णांच्या अन्य गरजांबद्दल निर्णय घेण्यास मदत करतात. वैद्यकीय प्रतिमांचे विश्लेषण करण्यासाठी ए.आय. साधने वापरून सीटी स्कॅन, एक्स-रे, एमआरआय आणि इतर प्रतिमांचे विश्लेषण करण्यासाठी कसा केला जातो आणि मानवी बुद्धिमत्तेला ए.आय. कशी स्पर्धा देऊ शकतो यावर ए.आय. तज्ज्ञ अधीश थिटे यांनी उदाहरण देऊन समजावले. अधीश थिटे हे अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथे मुख्य ए.आय. स्ट्रॅटेजिस्ट म्हणून काम पाहत आहेत. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा भावी डॉक्टर्सना व्हावा म्हणून ही कार्यशाळा दि. १ मार्च २०२५ रोजी आयोजित केली गेली होती. विद्यार्थ्यांनीही अनेक प्रश्न, शंका विचारून उत्तम प्रतिसाद दिला.

# वालावलकर रुग्णालयातर्फे हळदीकुंकू कार्यक्रमातून 'कौशल्य विकास' जागृती





श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आणि वालावलकर महाविद्यालयातर्फे रुग्णालयाच्या आवारात असलेल्या श्रीगणेश मंदिरात माघी गणपती उत्सवात सामुदायिक हळदीकुंकू सभारंभ आयोजित करण्यात आला होता.

प्रतिवर्षी संपन्न होणाऱ्या हळदीकुंकू सभारंभाला पंचक्रोशीतील सावर्डे, डेरवण, फुरुस, कोसंबी, दहिवली, खरवते, निवळी, तुरंबव इत्यादी तसेच आजूबाजूच्या इतर गावांतील महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. जवळजवळ १३७० सुवासिनींनी हळदीकुंकू समारंभाला हजेरी लावली. कार्यक्रमाचे औचित्य साधून महिलांना स्वावलंबी होण्यासाठी कौशल्य विकास केंद्रातर्फे विविध प्रकारच्या शोभेच्या वस्तू, तोरणे, पर्स, वॉलेट, खादीच्या पिशव्या, खणाचे कापडाचे फाईल फोल्डर, साबण, अत्तर, आयुर्वेदिक तेल यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आणि महिलांना व तरुणींना प्रशिक्षण घेण्याकरता प्रोत्साहित केले गेले.










भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# 'बिल्डिंग एनर्जी सिस्टिम्स' या विषयावर श्री. निजानंद सरवटे यांचे व्याख्यान



*श्री. निजानंद सरवटे व्याख्यान देताना*

दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी 'बिल्डिंग एनर्जी सिस्टिम्स' या विषयावर श्री. निजानंद सरवटे यांचे इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. श्री. निजानंद हे BE (Mech.), MS in Energy Systems with specialization in building energy systems from North-eastern University, Boston, Massachusetts, US असून याच क्षेत्रात अमेरिकेत कार्यरत आहेत.

Renewable आणि Non-Renewable ऊर्जेच्या संकल्पनांपासून त्यांनी व्याख्यानाची सुरुवात केली. Non-Renewable (कोळसा, पेट्रोलियम इंधन, नैसर्गिक वायू आणि अणुऊर्जा) आणि Renewable (सौर पीव्ही, पवन ऊर्जा, भू-औष्णिक ऊर्जा आणि जलविद्युत) या ऊर्जास्रोतांचा वापर इमारतींच्या ऊर्जाप्रणालींमध्ये वीज, तापमान नियंत्रित करणे आणि शीतकरणासाठी केला जातो. तसेच जीवाश्म इंधने आणि अणु विभाजन मोठ्या प्रमाणात ऊर्जा पुरवतात, परंतु त्यांच्यामुळे पर्यावरणीय आणि शाश्वततेसंबंधी आव्हाने निर्माण होतात याविषयी विस्ताराने माहिती दिली. पुढे त्यांनी विद्यार्थ्यांना 'उद्याच्या ऊर्जा प्रणाली' याविषयी सांगताना भविष्यातील ऊर्जा गरजांसाठी आशादायी तंत्रज्ञान असणाऱ्या अणु-संलयन (Nuclear Fusion)या विषयी माहिती दिली.

ऊर्जेची शाश्वतता साध्य करण्यासाठी आधुनिक इमारती ऊर्जा कार्यक्षमता, स्मार्ट नियंत्रण प्रणाली आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या धोरणांवर लक्ष केंद्रित करतात. या अनुषंगाने श्री. सरवटे यांनी 'ग्रीन बिल्डिंग' या संकल्पनेचे स्पष्टीकरण दिले. ग्रीन बिल्डिंग म्हणजे पर्यावरणीय परिणाम कमी करताना रहिवाशांचे आरोग्य आणि कल्याण वाढवण्यासाठी डिझाइन केलेल्या इमारती. या इमारतींमध्ये पर्यावरणपूरक साहित्य, कार्यक्षम प्रकाशयोजना आणि उष्णता टिकवून ठेवणाऱ्या खिडक्या वापरल्या जातात. त्यामुळे ऊर्जेचा वापर कमी होतो. चांगल्या प्रकारे नियोजित सौर वेळापत्रकामुळे नैसर्गिक प्रकाशाचा अधिकाधिक वापर करता येतो आणि उबदारपणाही राखला जातो. वायुविजन, कमी उत्सर्जन करणारी सामग्री आणि सामान्य इमारतीतील प्रदूषकांवर नियंत्रण ठेवून अंतर्गत पर्यावरण गुणवत्ता सुधारली जाते. टिकाऊपणा आणि देखभालीची सुलभता लक्षात घेऊन, कमी देखभाल लागणाऱ्या आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या इमारती तयार केल्या जातात. येथे कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर धोरणांवर भर दिला जातो. या सर्व घटकांच्या एकत्रित वापरामुळे ग्रीन बिल्डिंग ह्या टिकाऊपणा, रहिवाशांचे आरोग्य आणि दीर्घकालीन खर्च यांच्या बचतीसाठी मदत करतात.

व्याख्यानाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी विषयाशी संबंधित अनेक प्रश्न विचारले आणि आपले शंका समाधान करून घेऊन या विषयाचे महत्त्वच अधोरेखित केले.

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवरबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035